# The Status of Women in Ancient India : Vedic And Post-Vedic Period (प्राचीन भारतातील स्त्रियांची स्थिती : वैदिक आणि वेदोत्तर कालखंड)

संशोधक विद्यार्थी: अमोल शेषराव गवई

मार्गदर्शक : डॉ. अपर्णा सुनिल अग्निहोत्री वसंतराव नाईक शासकिय कला व समाज विज्ञान संस्था, नागपूर (महाराष्ट्र)

---

**प्रस्तावना** :

गरज ही शोधाची जननी असे संबोधले जाते. पुरातन काळापासून स्त्रिया व मानवाने विविध प्रकारच्या कला जोपासल्या आहेत, अगदी अश्मयुगातील मानवाने देखील अनेक प्रकारच्या कला जोपसल्याचे चित्र दिसून येते. जसे मानव स्वीकार करू लागला व कच्चे मास खावून आपले जीवन जगत असे, उरलेल्या कातडीचे वाद्य तयार करून वादन करत असे, आपल्या मनाचे रंजन करण्यासाठी तो या प्रकारच्या कलांचा उपयोग करत असे. जसजसा माणूस व स्त्रिया समूहाने राहू लागले, स्त्री-पुरुषांमध्ये एकोपा निर्माण झाला, यातूनच कुटुंब पद्धती उदयास आली जशी कुटुंब पद्धती उद्यास आली, त्याच प्रमाणे विविध कला प्रकारांची उत्पत्ती झाली जसे पेरणी (पेरणीची गाणी), अंगाई गीत, देवदेवतांची गाणी, नृत्य इत्यादी हे कलाप्रकार जनमानसाच्या व स्त्रियांच्या मनातील भावना व्यक्त करण्यासाठी उदयास आले असल्याचे दिसून येते.

पुढे वैदिक कालखंडामध्ये संगीत कलेसाठी विविध नियमांचे पालन करावे लागत असे सर्व कलाप्रकारांना जसे साहित्य, व्याकरण, पाककला, स्थापत्यकला, संगीतकला, व नृत्यकला इत्यादी. वैदिक कालखंडात ऋग्वेद, यजुर्वेद, अथर्ववेद व सामवेद या चार वेदांमध्ये सर्वच कलांचा उल्लेख आढळून येतो. परंतु संगीतकला व नृत्यकला ह्या दोन्ही कला स्त्रियांसाठी महत्त्वपूर्ण होत्या व या कलांचा उल्लेख सामवेद मध्ये आढळून येतो.

स्त्रियांना जगत्र जननी म्हणून आज समाजामध्ये स्थान आहे. भारतीय संस्कृतीचा मुलाधार वैदिक संस्कृती आहे. वैदिक संस्कृतीमध्ये स्त्रियांचे राहणीमान व कला या विषयी या शोधपेपर मध्ये मांडणी करण्यात येणार आहे. सिंधू संस्कृतीच्या अवस्थेनंतर वैदिक संस्कृतीचा उदय झाला. या संस्कृतीचा भारत भूमीमध्ये उदय इ.स.४००० वर्षांपूर्वी झाला, असल्याचे इतिहासकारांचे मत आहे. आणि याचं संस्कृतीने कायम आपली अस्मिता टिकून ठेवली आहे. सामाजिक स्थैर्य प्राप्त करून देणाऱ्या विवाह संस्था, कुटुंब पद्धती, कला संस्कृती इत्यादी निर्माण करण्यात आल्या. वैदिक वाङ्मयात या संस्कृतीची माहिती सहज उपलब्ध होते आणि म्हणूनच या संस्कृतीला वैदिक संस्कृती असे संबोधले जाते. प्राचीन काळापासून जसजशी मानवाची प्रगती होत गेली व मानव आणि स्त्रियांमध्ये परिवर्तन होत गेले. कारण इतिहासाचा नियमच असा आहे की बदल म्हणजेच इतिहास होय. म्हणूनच प्राचीन काळापासून आजतागायत स्त्रियांची समाजातील प्रतिष्ठा कायम असल्याचे दिसून येते. स्त्रियांचा इतिहासानेचं भारतीय इतिहासाला प्रभावित केले आहे. प्राचीन भारतातील स्त्रिया विषयी या शोध पेपर मध्ये अभ्यासले जाणार आहे स्त्रियांच्या उत्थानासाठी इतिहासात घडून गेलेल्या स्त्रियांचा इतिहास आधुनिक कालखंडात स्त्रियांच्या प्रगतीसाठी कसा प्रेरणादायी होईल तसेच समाज निर्मितीमध्ये स्त्रियांचे महत्त्वपूर्ण भूमिका कशी योग्य ठरली जाते, कला ही जन्मतः आवडीचा विषय आहे. स्त्रियांच्या सर्वोत्कृष्ट साधनांची रूप कलेच्या माध्यमातून प्रकट होते. कला ही स्त्रियांच्या सृजन आणि प्रत्यक्ष अनुभवाच्या कल्पनेवर अवलंबून असते. स्त्रियांनी व मानवाने जीवनात जे सुखद आणि आनंददायी अनुभव मिळविलेले आहेत तेच कलेच्या माध्यमातून प्रकट होतात. कला ही कलाकारांच्या अंतरीक भावना अनुभव विचार व कल्पनेवर अवलंबून असते. प्राचीन भारतातील सभ्यता आणि संस्कृती याविषयी भारत देशाने विश्वामध्ये आपले आगळे वेगळे स्थान मिळवले आहे. प्राचीन कालखंडापासून भारतातील स्त्रियांची भूमिका ही महत्वपूर्ण अग्रभागी ठरली आहे. भारतातील सभ्यता व कला संस्कृती ही या भारत देशातील मूल रहस्य आहे, असे समजायला काही हरकत नाही. कारण प्राचीन कालखंडापासूनच आजतागायत जसजसा मानव व स्त्रियांचा विकास होत गेला तस-तसा कला संस्कृतीमध्ये सुद्धा विकास क्रमशः झालेला दिसून येतो. जसे प्राचीन वैदिक कालखंडात स्त्रियांचा पोशाख, राहणीमान, सन, कला-उत्सव इत्यादी जसा वैदिक कालखंडामध्ये होता तसा आधुनिक कालखंडातही असलेच असे सांगणे कठीण आहे, प्राचीन वैदिक कालखंडामध्ये स्त्रिया संगीत नृत्य कलेमध्ये निपुण होत्या.

टॉलस्टॉय यांच्या मते – "आपल्या मनातील भावभावना क्रिया रंग रेखा किंवा शब्द यांच्या माध्यमातून अशा प्रकारे व्यक्त करणे की त्यांच्या दर्शनाने क्रिया, श्रवणाने दुसऱ्याच्या मनात तसेच भावतरंग निर्माण व्हावे यालाच कला असे म्हणतात."

क्रोचे यांच्या मते – "कलेची अभिव्यक्ती ही प्रथमतः मनात निर्माण होते व नंतर तिचा बाह्य अविष्कार होतो, या घडणाऱ्या क्रियेलाच कला असे म्हणतात."

या दोन्ही व्याख्येवरून असे निदर्शनास येते की, मानव व स्त्रिया ह्या आपल्या भावभावना मनातील व्यक्त करण्यासाठी नृत्य व गीतातून आपली अभिव्यक्ती करतात.आणि म्हणूनच आपली भारतीय संस्कृती याच माध्यमातून जतन आहे.

वैदिक कालीन कलांमध्ये स्त्रियांची भूमिका :

स्थापत्यकला, वास्तुकला, काव्यकला, शिल्पकला, चित्रकला, नाट्यकला, संगीतकला, नृत्यकला इत्यादी कलांमध्ये स्त्रियांनी आपले अस्तित्व निर्माण केलेले आढळून येते. प्राचीन वैदिक कालखंडापासून आजतागायत असा एकही कालखंड दिसून येत नाही, त्यामध्ये स्त्रियांची कला शाखेत सहभाग नाही. महर्षी भरत यांच्या पूर्वी इ.स.सन १ शतकात ललित कला व इतर उपयोगी असलेल्या कला या सर्वांना मिळून 'शिल्प' अशी एकच संज्ञा होती. वैदिक शास्त्र संहिता यात कलेला 'शिल्प' शब्द याच अर्थाने संबोधल्या जात असे. कौत्तितकी ब्राह्मणात नृत्य व गीत या कलेलाही 'शिल्प' असेच म्हटले जात असे. तसेच पाणिनी यांच्या अष्टअध्यायी संस्कृत ग्रंथात तसेच तत्कालीन संस्कृत व बौद्ध साहित्यात 'शिल्प' शब्दाचा उपयोग सर्व कलांसाठी केलेला आढळून येतो.

प्राचीन वैदिक कालखंडामध्ये एकूण ६४ कलाप्रकार मानल्या गेल्या आहेत. त्यामध्ये संगीतकला, शिल्पकला, चित्रकला, वास्तुकला, काव्यकला व पाककला ह्या महत्त्वाच्या कला म्हणून समजल्या जातात. या सर्वच कला जिवंत ठेवण्याची महत्त्वपूर्ण भूमिका ही स्त्रियांचीच आहे. चंद्रगुप्त मौर्याने पाटलीपुत्र येथे बांधलेला राजवाडा हा मौर्य काळातील वास्तुकलेचा सुंदर नमुना म्हणून सांगता येईल. वेरूळ, अजिंठा, भाजे, कारले, जुन्नर, नासिक, घारापुर(एलिफंटा) व उस्मानाबाद येथे चैत्य व विहार स्वरूपात वास्तू पाहावयास मिळतात. या वास्तूंमध्ये स्त्रियांची कोरीव काम केलेले आढळून येते. गुप्त कालखंडात दगड विटांनी बांधलेले मंदिरे हा वास्तूचा कलाप्रकार उदयास आला. कंधार येथे राष्ट्रकूट काळातील स्वतंत्रपणे बांधलेली बारा शिवमंदिरे होती. अशाच प्रकारचे मंदिरे कांची, महाबलीपुरम, हाट्टाल ता. देगलूर, धर्मापुरी ता.परळी वैजनाथ, निलंगा, बीड, भोकर, आन्वा, औंढा नागनाथ इत्यादी ठिकानील स्तूप हा वास्तुकलेचाचं प्रकार आहे. कंधार, सारनाथ, सांची, अजिंठा येथील स्तूप विहारे जगप्रसिद्ध ठरले आहेत. या स्तूपांमध्ये स्त्रियांनी वाजवलेली वाद्य तसेच नृत्यांगना यांचाही उल्लेख स्तूप लेणीमध्ये असल्याचे आढळून येते.

**मनोरंजनाची साधने** :

धार्मिक विधी,समारंभ, यज्ञविधी, सार्वजनिक उत्सव इत्यादी प्रसंगी स्त्रिया नृत्य व संगीत विषयक मनोरंजनात्मक कार्यक्रमाचे आयोजन केले जात होते. यामध्ये काही स्त्रिया नृत्य व गायन करत, रसिकांचे मनोरंजन करीत असतांना तसेच समाजात गायक,वादक,गायिका यांचा स्वतंत्र वर्ग केल्या जात असे. विविध समारंभात नृत्याचा प्रकार लोकप्रिय होता. वैदिक कालखंडात स्त्रिया व पुरुष यांचे संपूर्ण जीवन संगीतमय होते, त्यामुळे या काळातील स्त्री-पुरुषांचे चेहरे ही नेहमी प्रसन्न दिसून येत असत काही विद्वानांच्या मते स्त्री-पुरुषांचे चेहरे हे गुलाब पुष्पा सारखे तेजवूनमुख असत. "वैदिक कालखंडातील स्त्री व पुरुष हे आपल्या जीवनाचे उपनाव संगीत आणि संगीताचे उपनाव जीवन असे संबोधले जात असे." वैदिक यज्ञ पूजनाच्या वेळी गायन करून यज्ञपूजा केली जात होती. शतपत ब्राह्मणामध्ये पृथ्वीक व त्यांची पत्नी यांच्या नृत्य गीताचा अविष्कार केल्याचे अनेक ग्रंथांमध्ये उल्लेख आढळून येतो.

**वेदोत्तर कालखंड** :

वेदोत्तर कालखंडामध्ये संगीत कलेला विशिष्ट महत्त्वपूर्ण असे स्थान नव्हते, या कालखंडामध्ये स्त्रियांची स्वतंत्र जीवन जगण्याची स्थिती खालावली गेली होती. या कालखंडामध्ये वर्णव्यवस्थेची विकृती निर्माण करणारी जाती व्यवस्थेचा उदय झाला. जीवनातील चार पुरुषांथाची ध्येय प्राप्ती करण्यासाठी आश्रम व्यवस्था निर्माण झाली. स्त्रियांचे समाजातील व कुटुंबातील स्थान दुय्यम प्रतीचे बनले, व वैदिक उत्तर कालखंडापासून स्त्रियांचे स्वतंत्र हिरावून घेतले गेले. या कालखंडामध्ये विवाह पद्धतीचे आठ प्रकार अस्तित्वात होते, त्यापैकी ब्राह्म, अर्श, वैश्य, प्राजपत्य हे प्रकार योग्य मानलेले होते. आसूर, राक्षस, पिशाच्च व गांधर्व ह्या चार पद्धती विशिष्ट होत्या. यामध्ये कोणतेही धार्मिक विधी नव्हती, तसेच आंतरवर्णीय विवाहाचे अनुलोम व प्रतिलोम हे दोन प्रकार देखील प्रचलित होते. परंतु अंतरवर्णीय विवाह पद्धतीला फारशी समाज मान्यता नव्हती या कालखंडात एक पत्नी पती विवाह पद्धती योग्य मानलेली होती.

वेदोत्तर काळात स्त्रियांचा दर्जा हा खालावला गेला होता, तिचे समाजातील व कुटुंबातील उच्च स्थान नष्ट झाले होते, मुलींना शिक्षण घेणाऱ्या छात्रीशाला स्थापन झाल्या, स्त्री शिक्षण सार्वत्रिक नव्हते. वेदोत्तर कालखंडात स्त्रिया ही पुरुषांची खाजगी मालमत्ता समजल्या जाऊ लागली, मुलींचा जन्म म्हणजे दुःखाचे मूळ समजून तिची तुलना मद्य व धूत ह्या व्यसनाबरोबर केलेली दिसून येते. वैदिक काळात पित्याला 'तत्' व मातेला 'नना' ह्या संज्ञेने संबोधले जात असे. वैदिक आणि वेदोत्तर कालखंडामध्ये स्त्रियांची स्थिती खालावली गेली असली तरीही काही कालांतराने वैदिक कालखंडामध्ये असलेली स्थिती ही

संपुष्टात येवून काही, कालांतराने स्त्रियांचे जीवनमान अधिक उंचावले गेले. स्त्रियांना योग्य प्रकारचे स्थान प्राप्त झाले. आज आधुनिक युगामध्ये स्त्रिया ह्या प्रत्येक क्षेत्रामध्ये समोर असल्याचे दिसून येते. कला, साहित्य, राजकीय, सामाजिक इत्यादी सर्व घटकांमध्ये स्त्रियांची भूमिका ही उच्च प्रतीची असलेली दिसून येते.

**निष्कर्ष** :

थोडक्यात प्रस्तुत संशोधन लेखामधून असे निर्दशनास येते कि, वैदिक कालखंडात स्त्रियांची स्थिती उच्च प्रतीची होती परंतु वेदोत्तर कालखंडामध्ये स्त्रियांना निम्नदर्जेचे स्थान होते कारण या कालखंडामध्ये मनुस्मृतीनुसार स्त्रियांना वागणूक दिली जात असे. आणि जेंव्हा या भारत देशामधून मनुस्मृतीला नष्ट केल्या गेले तेंव्हापासून स्त्रियांना उच्चप्रतीचे स्थान प्राप्त झाले. स्त्रियांचे जीवन सुखमय व आनंदायी झाले. सर्वच कला जिवंत व जतन करुण ठेवण्याची महत्त्वपूर्ण भूमिका ही स्त्रियांची मानली गेली आहे.

**सहाय्यक ग्रंथ सूची :**

1. भारतीय सभ्यता एवम संस्कृती का इतिहास, लेखक - डॉ. बिपिन कुमार मिश्रा,प्रकाशक - आर्यन पब्लिकेशन,२०११
2. प्राचीन भारत का सामाजिक इतिहास, लेखक - कैलास चंद्र जैन,प्रकाशक - युनिव्हर्सिटी पब्लिकेशन न्यू दिल्ली, पहिले संस्करण,२०११
3. भारतीय कलेचा इतिहास, लेखक – डॉ. अनिल कठारे, प्रकाशक - कल्पना प्रकाशन नांदेड पहिली आवृत्ती,२००८
4. भारतीय संगीत का इतिहास, लेखक – ठाकूर जयदेव सिंह, संगीत रिसर्च अकादमी, कलकता प्रकाशन वर्ष – ११९४
5. भारतीय इतिहास मे संगीत , लेखक - भागवत शरण शर्मा, संपादक - बाळकृष्ण गर्क, प्रकाशक - संगीत कार्यालय हातरस, उत्तर प्रदेश, २०१०
6. प्राचीन भारत मे संगीत, लेखक - पुनम मिश्रा,प्रकाशक - अर्जुन पब्लिकेशन हाऊस दिल्ली, पहिला संस्करण २००३